महाराष्ट्र शासन

# उपनिबंधक सहकारी संस्था पी विभाग, मुंबई

**रुम नं. ३०३, तिसरा मजला ए विंग, बी. एम. सी. गोडावुन बिल्डिंग, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, ठाकुर कॉम्प्लेक्स, ९० फुट रोड,कांदीवली (पुर्व), मुंबई ४०० १०१.**

---

जा.क्र.मुंबई/उपनि/पी विभाग/४३६ /सन २०२३
दिनांक :- ८ / २ /२०२३

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
नुतन आयोजन नगर को.ऑप.हौ.सो.लि.,
लिबर्टी गार्डन, क्रॉस रोड नं ४,
मालाड (प), मुंबई- ४०००६४.

**विषय :-संस्थेच्या इमारतीच्या पुर्नविकासाबाबत....**
**संदर्भ :- १) संस्थेचा दि.११/०१/२०२३ रोजीचा प्राप्त प्रस्ताव**
**२)या कार्यालयाचे प्राधिकृत अधिकारी नियुक्तीबाबतचे दि.१२/०१/२०२३ रोजीचे पत्र**
**३) प्राधिकृत अधिकारी यांनी दि. ०३/०२/२०२३ रोजी या कार्यालयात सादर केलेला विशेष सर्वसाधारण सभेचा अहवाल.**

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अवलोकन व्हावे.

२/- नुतन आयोजन नगर को.ऑप.हौ.सो.लि., लिबर्टी गार्डन, क्रॉस रोड नं ४, मालाड (प), मुंबई- ४०००६४. ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदणीकृत संस्था असून तीचा नोंदणी क्रं- बीओएम/एचएसजी/पीआर/७४८६ सन १९८१-८२ असा आहे.

संस्थेने संदर्भ क्रं १ च्या पत्राद्वारे संस्थेच्या इमारतीच्या पुर्नविकासाचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल करुन त्यांनी पुर्नविकासाबाबतचे दि.४/७/२०१९ रोजीचे शासकीय/परिपत्रकामधील तरतूदीनुसार अंतिम विकासक निवडीसाठी बोलिवलेल्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणेकरीता विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाने संदर्भ क्रं २ च्या पत्रान्वये आपल्या संस्थेच्या दि.२९/०१/२०२३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणेसाठी या कार्यालयातील श्री.धर्मेंद्र शिंदे, सहकारी अधिकारी श्रेणी-२ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती.

प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेने बोलविलेल्या दि.२९/०१/२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहून विकासक नियुक्तीचा पारित केलेल्या ठरावाबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. उक्त अहवालाचे अवलोकन केले असता. सदर सभेमध्ये एकूण १९८ सभासदांपैकी १५२ सभासद प्रत्यक्षात उपस्थित होते. व zoom app द्वारे ११ सभासद होते. अशाप्रकारे प्रत्यक्षात उपस्थित १५२ सभासदांपैकी १२४ सभासदांनी व zoom app द्वारे ११ सभासदांनी अशा प्रकारे एकुण १३५ सभासदांनी संस्थेच्या इमारतीच्या पुर्नविकास करण्यासाठी विकासक म्हणून **M/s Arkade Developers Pvt. Ltd.,** यांची नियुक्ती केलेली आहे.

सबब, संस्थेने या कार्यालयात दाखल केलेला पुनर्विकासाचा प्रस्ताव, संस्थेची दि.२९/०१/२०२३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयात दाखल केलेल्या अहवालाचे अवलोकन करता दि.४/७/२०१९ रोजीच्या परीपत्रकामधील तरतूदीनुसार तसेच सदर प्रक्रिया पूर्ण करताना दि.०४/०७/२०१९ चे परीपत्रकात नमूद केलेनुसार सर्व अटींचे अनुपालन काटेकोरपणे करावे व प्रक्रिया पूर्ण झालेनंतर या कार्यालयाचे प्रतिनिधी समक्ष सदनिका वाटप/वितरण करण्याचे कार्यवाही करावी. तसेच नवीन सभासद हे पुनर्विकास प्रकल्प पूर्ण झाल्यावर या कार्यालयाच्या मान्यतेनेच घेण्यात येतील. उक्त संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाबाबतची पुढील उचित कार्यवाही करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

**(प्रतिक पोखरकर)**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई**

**प्रत:-**

**M/s Arkade Developers Pvt. Ltd, Arkade house, opp. Bhoomi arcade, near childrens Academy, A.S marg, ashok nagar, Kandivali e), Mumbai ४००१०१.**

**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,पी विभाग, मुंबई**